महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/कोवीड-१९/ ८४३९
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २०/०४/२०२१

# परिपत्रक

**विषय : करोना विषाणू रोगाचा प्रादुर्भाव झालेल्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांना सहायता करणेबाबत.**

**संदर्भ** : १) परिपत्रक क्र. ९४२७ दि. ०३.०५.२०२०
२) परिपत्रक क्र. ९९६९ दि. ३१.०५.२०२०
३) परिपत्रक क्र. ११५४५ दि. १९.०६.२०२०
४) परिपत्रक क्र. १५७२५ दि. २८.०९.२०२०

कोवीड १९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडुन वेळोवेळी कोवीड १९ च्या व्यवस्थापनाबाबत सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या असून कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांच्या योग्य त्या खबरदारीसाठी सदर सुचना कंपनीमध्ये अंगीकृत करण्यात आलेल्या आहेत.

२. कोवीड १९ मुळे उद्भवलेल्या सध्याच्या गंभीर परिस्थितीचा विचार करता व सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या मंजुरीनुसार कंपनीच्या मुख्य कार्यालय, प्रादेशिक कार्यालय व परिमंडळ कार्यालय येथे कोवीड १९ समन्वय कक्ष स्थापन करण्याचे ठरविलेले आहे. या तिन्ही कार्यालयात खाली नमुद केलेले अधिकारी समन्वय कक्षाचे काम पाहतील.

| मुख्य कार्यालय | प्रादेशिक कार्यालय | परिमंडळ कार्यालय |
|---|---|---|
| मुख्य महाव्यवस्थापक (मासं)<br>प्रमुख | सह मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी<br>प्रमुख | उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी<br>प्रमुख |
| महाव्यवस्थापक (मासं-मासंव्यप्र)<br>सदस्य | अधिक्षक अभियंता<br>सदस्य | मुख्य अभियंता यांनी नामनिर्देशित केलेले<br>सदस्य |
| मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी<br>सदस्य | उप मुख्य महाव्यवस्थापक (मासं)<br>सदस्य | मुख्य अभियंता यांनी नामनिर्देशित केलेले<br>सदस्य |
| सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी<br>सदस्य | महाव्यवस्थापक (वित्त)<br>सदस्य | मुख्य अभियंता यांनी नामनिर्देशित केलेले<br>सदस्य |

३. कोवीड १९ समन्वय कक्षाच्या कामकाजाबाबत खालील सुचनाची नोंद घ्यावी

क) समन्वय कक्षातील अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील करोना विषाणू रोगाचा संसर्ग झालेल्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांची व बाहयस्त्रोत कर्मचाऱ्यांची माहिती घेतील व त्यांना जवळचे रुग्णालय याची माहिती देतील. तसेच रुग्ण्यालयामध्ये खाट (Bed) व औषधे उपलब्ध करण्याबाबत योग्य ती सहायता करतील.

ख) परिमंडळ कार्यालयातील समन्वय कक्षामध्ये कार्यरत अधिकारी परिमंडळ कार्यक्षेत्रातील करोना विषाणू रोगाचा संसर्ग झालेल्या सर्व कंपनीच्या कर्मचाऱ्यांची व बाहयस्त्रोत कर्मचाऱ्यांची तपशीलवार माहिती दररोज संकलित करतील व परिमंडळाचा अहवाल अद्ययावत करुन प्रादेशिक कार्यालयास दररोज सकाळी १०.३० पूर्वी सादर करतील. सदर माहितीसोबत ज्या कर्मचाऱ्यांनी प्रथम अथव व्दितीय लस घेतली आहे त्यांची एकूण संख्या व ज्या प्रकरणी मृत्यूपश्चात सानुग्रह अनुदान मंजूर व अदा केले आहे त्याची संख्या देखील कळविण्यात यावी.

ग) प्रादेशिक कार्यालयातील समन्वय कक्षामध्ये कार्यरत अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील परिमंडळ कार्यालयामधून करोना विषाणू रोगाचा संसर्ग झालेल्या कंपनीच्या कर्मचाऱ्याची तपशीलवार माहिती दररोज संकलित करतील व प्रादेशिक कार्यालयाचा अहवाल अद्ययावत करुन मुख्य कार्यालयास दररोज सकाळी ११.०० वाजता सादर करतील. त्याचप्रमाणे एखादया प्रकरणी कर्मचाऱ्यासाठी रुग्णालय अथवा उपचार उपलब्ध होण्यास परिमंडळ कार्यालयास काही अडचणी आल्यास त्यांना योग्य ती सहायता करतील. त्यानंतरही कर्मचाऱ्यास काही सहाय्य लागल्यास त्याची माहिती तात्काळ मुख्य कार्यालयातील समन्वय कक्षाला दूरध्वनीद्वारे देतील जेणेकरुन याबाबत योग्य ती कार्यवाही त्या कक्षाकडून करणे शक्य होईल.

घ) मुख्य कार्यालयातील कक्षाचे सदस्य सह मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी दररोज (सुट्टीच्या दिवशी देखील) सकाळी ११.०० वाजता आभासी माध्यम (Video Conference) द्वारे सर्व समन्वय कक्षाशी संपर्क साधतील व त्यांच्याकडून दररोजची माहिती घेतील. त्यानंतर सर्व कार्यालयांचा एकत्रित केलेला अद्ययावत अहवाल मुख्य महाव्यवस्थापक (मासं) यांना तात्काळ सादर करतील.

४. करोना १९ मुळे उद्भवलेल्या गंभीर परिस्थितीमध्ये कंपनीच्या कामकाजामध्ये कोणताही अडथळा येऊ नये म्हणून व त्याचप्रमाणे कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने यापूर्वी अनेक हितकारक निर्णय घेण्यात आलेले असून त्यातील खालील नमूद केलेले मुख्य निर्णय सन २०२१ मध्ये देखील लागू राहतील.

क) ज्या कर्मचाऱ्यांना कोवीड-१९ विषाणूची बाधा झाली आहे / होती किंवा शासनाच्या सूचनांच्या अनुषंगाने ज्यांचे विलगीकरण (Quarantine) करण्यात आलेले आहे / होते अशा कर्मचाऱ्यांच्या उपचाराचा अथवा विलगीकरणाचा कालावधी कर्तव्य कालावधी समजण्यात येईल.

ख) कंपनीतील वेतनगट ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांना सन २०२१ साठी रु. १०००/- इतकी रक्कम सॅनिटायझेशन किट करिता एकवेळेस विशेषबाब म्हणून देण्यात येईल.

ग) परिपत्रक क्र. १५७२५ दि. २८.०९.२०२० अन्वये करोना विषाणू रोगाचा प्रादुर्भाव झालेल्या कर्मचाऱ्यास जर तो रुग्णालात दाखल होऊन उपचार घेत असल्यास रु. ५०,०००/- एवढा अग्रीम मंजूर करण्याची तरतूद करण्यात आली आहे. याच धर्तीवर जर कर्मचारी घरात विलगीकरणात किंवा विलगीकरणकक्षात उपचार घेत असल्यास सदर कर्मचाऱ्यास रु. २५,०००/- एवढी रक्कम अग्रीम म्हणून मंजूर करण्यात येईल व कर्मचारी कामावर रुजू झाल्यानंतर समान १० हप्त्यामध्ये वसूली करण्यात येईल. याकरीता कर्मचाऱ्याने कोरोना बाधित असल्याबाबत अँटीजेन / RTPCR चाचणी अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

घ) वीज वितरणाचे काम आरोग्य व पोलीस सेवा सारखेच अत्यावश्यक सेवेप्रमाणे आहे. त्यामुळे कंपनीतील सर्व कर्मचारी व बाहयस्त्रोत कर्मचारी यांचे लसीकरण करून घेण्याकरिता योग्य ती कार्यवाही मुख्य कार्यालय स्तरावर सुरु आहे. तथापी महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार कंपनीतील ४५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे स्व:ताचे लसीकरण प्राधान्याने दि. ३०.०४.२०२१ पूर्वी नियमाप्रमाणे करुन घ्यावे.

च) वेतनगट ३ व ४ मधील नियमित अथवा कंत्राटी कर्मचारी (सर्व सहाय्यक) कोवीड १९ विषाणूबाधीत झाल्यास किंवा त्यांचे विलगीकरण करण्यात आल्यास केवळ अशा प्रकरणी रिक्त झालेल्या जागा, सक्षम अधिकारी, कंपनीच्या नियमांनुसार आवश्यकता भासल्यास बाहस्त्रोताद्वारे भरुन कंपनीचे कामकाज सुरळीतपणे पार पडेल याची दक्षता घेतील. तसेच नियमित अथवा कंत्राटी कर्मचारी पुन:श्च कामावर रुजू झाल्यानंतर संबंधित बाहयस्त्रोत कामगारांच्या सेवा तात्काळ बंद करण्यात याव्यात. सदर सुविधा केवळ सन २०२१ करिताच मर्यादित राहील.

छ) परिपत्रक क्र. ११५४५ दि. १९.०६.२०२० अन्वये घोषित केलेले रु. ३० लक्ष रकमेचे सानुग्रह सहाय्य, दि. ०१.१०.२०२० नंतर कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या नियमित (प्रशिक्षणार्थी व सहाय्यक यांच्यासह) तसेच बाहयस्त्रोत कर्मचारी व सुरक्षारक्षक यांच्या वारसांना सदर परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार अदा करण्यात येईल.

५. महावितरण कंपनीतील कोणत्याही कर्मचाऱ्यास किंवा त्याच्या कुटुंबियांना कोवीड-१९ या विषाणूचा प्रादुर्भाव झाल्यास त्यांना रूग्णालयामध्ये खाटा (Bed) उपलब्ध होत नसल्यास किंवा गृह-विलगीकरणाची योग्य सोय होत नसल्यास अशा व्यक्तींना कंपनीच्या त्याच अथवा जवळच्या वसाहतीमधील रिक्त असणाऱ्या निवासस्थानांची उपलब्धता करून देण्यात यावी.

क) कंपनीच्या वसाहतीमधील निवासस्थाने सुस्थितीत नसल्यास त्यांची तात्काळ डागडुजी करून काही निवासस्थाने तातडीची बाब म्हणून पुढील आदेश होईपर्यंत गृह-विलगीकरणासाठी राखीव करून घेण्यात यावीत. याकरीता निवासस्थान वाटपाचे अधिकार ज्या अधिकाऱ्याकडे निहीत असतील असे सर्व अधिकारी या कोवीड-१९ सहाय्यता कक्षाला सक्रीयपणे सहकार्य करतील.

ख) ज्या इमारतीमध्ये कर्मचारी / त्याचे कुटुंबीय राहत नाहीत अथवा सदर इमारतीस संलग्न विश्रामगृह नाही केवळ अशा स्वतंत्र इमारतीमध्ये गृह-विलगीकरणाची सोय करण्यात यावी. एखाद्या इमारतीमधील सदनिकांमध्ये कर्मचारी / त्याचे कुटुंबीय राहत आहेत अथवा त्याच इमारतीमध्ये विश्रामगृह आहे अशा इमारतींमध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये गृह-विलगीकरणासाठी परवानगी देण्यात येणार नाही.

ग) सदर निवासस्थानांचे वाटप हे ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यकक्षेत येत असेल अशा अधिकाऱ्यांनी मानवतेच्या दृष्टीकोनातून गृह-विलगीकरणात असणाऱ्या कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबीय यांच्या विलगीकरणाच्या कालावधीतील खानपानाची यथायोग्य व्यवस्था कंपनीच्या संबंधित कर्मचारी यांच्या विनंतीनुसार करून देण्याबाबत सहकार्य करावे.

घ) गृह-विलगीकरणासाठी आवश्यकता भासल्यास अतिरिक्त सोय म्हणून महावितरण कंपनीच्या नजीकच्या प्रशिक्षण केंद्रांचा तसेच तेथील प्रशिक्षणार्थ्यांसाठी राखीव असलेल्या निवासस्थानांचा देखील वापर करण्यात यावा.

च) कोवीड-१९ मुळे बाधित झाल्यामुळे कोणत्याही कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांची गैरसोय होणार नाही याची दक्षता कोवीड-१९ सहाय्यता कक्षामध्ये कार्यरत असणाऱ्या सदस्यांनी घ्यावी.

छ) सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांना (मुख्य अभियंता -परिमंडल कार्यालय) विनंती करण्यात येते की, कोवीड-१९ सहाय्यता कक्षाच्या कार्याबाबत दैनंदिन आढावा घेण्यात यावा.

६. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सहपत्र** :- वरील आदेशाची प्रत.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**